जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ९०६ दिनांक - ३०/१२/२०२३

### दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-०१,गुन्हे शाखा,पुणे शहर
### दुचाकी चोरणा-या दोन इसमांकडुन एकुण ०६ मोटार सायकली जप्त

पुणे शहरामध्ये दुचाकी वाहनांचे चोरीला आळा घालण्याकरीता मोहिम राबवुन कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी आदेश दिले होते. त्याअनुषंगाने दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-०१ कडील अधिकारी व अंमलदार असे **कोथरुड पोलीस स्टेशनकडील गुन्हा रजि नं.२८८/२०२३,भादंवि कलम ३७९** या गुन्ह्यांचा समांतर तपास करीत असताना,स्टाफ मधील पोलीस अंमलदार,सुमित ताकपेरे, महेश पाटील व श्रीकांत दगडे यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,नमुद गुन्ह्यातील दुचाकी चोरी करणारे दोन इसम हे वारजे ब्रिज जवळील चर्च जवळ, पुणे येथे थांबले असुन त्यांचेजवळ एक काळया व राखाडी रंगाची **YAMAHA FZ** मॉडेलची मोटार सायकल असुन,सदरची मोटार सायकल ही चोरीची असलेबाबतची माहिती मिळाली.

त्याप्रमाणे सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन वर नमुद इसमांना ताब्यात घेवुन,त्यांना त्यांचे नाव,पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे **१)कार्तिक दत्तात्रय दळवी,वय-२० वर्षे,रा.त्रिमुर्ती फ्लेक्स प्रिटींगच्या पाठीमागे,शिळीमकर यांचे घराजवळ,मु.पो.पौड,ता.मुळशी,जि.पुणे २)दिगंबर ऊर्फ दिनु अंकुश आंब्रे,वय-२६ वर्षे,रा.दिगंबर नाथ तरुण मंडळ, सचिन शेंडकर यांच्या रुममध्ये,पौड,पुणे व मुळपत्ता-चाळ नं.बी-११३,अप्पर इंदीरानगर,पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यांचेकडे सदर मोटार सायकलीचे कागदपत्रांबाबत चौकशी करता ते उडवा-उडवीची व असमाधानकारक उत्तरे देवु लागल्याने व त्यांनी सदर मोटार सायकलीचे कागदपत्र न दाखविल्याने सदर गाडीचे चासिस नंबर व इंजिन नबरं वरुन माहिती काढली असता,सदर गाडीबाबत **फरासखाना पोलीस स्टेशन,पुणे शहर येथे गुन्हा रजि नं.१८५/२०२३, भादंवि कलम ३७९ अन्वये** गुन्हा नोंद असलेबाबत माहिती समजल्याने सदर इसमांकडे अधिक चौकशी करता त्यांनी आणखी काही मोटार सायकली चोरी केल्याचे सांगितल्याने,त्यांना कोथरुड पोलीस स्टेशन गुन्हा रजि नं.२८८/२०२३,भादंवि कलम ३७९ या दाखल गुन्ह्यामध्ये अटक करुन,कोथरूड, फरासखाना, खडक, हवेली व कॅम्प पोलीस स्टेशन,अहमदनगर या पोलीस स्टेशनकडील एकुण ०६ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.

वरील नमुद आरोपींकडुन पुणे शहरचे ०४ व पुणे ग्रामीण कडील ०१ व बाहेरील जिल्ह्याकडील ०१ असे एकुण ०६ वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणुन त्यांचेकडुन किं रु १,४०,०००/- किचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन उर्वरित मोटार सायकलींबाबत अद्याप तपास चालु आहे.

सदरची कारवाई ही मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे) व अतिरिक्त कार्यभार पोलीस सह आयुक्त,श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,पुणे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-०१,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.क्रांतीकुमार पाटील, पोलीस उप-निरीक्षक,शाहीद शेख, पोलीस अंमलदार, आजीनाथ येडे, बाळु गायकवाड, प्रदीप राठोड, मॅगी जाधव, गणेश ढगे, रविंद्र लोखंडे, सुमित ताकपेरे, महेश पाटील, श्रीकांत दगडे, साईकुमार कारके, शिवाजी सातपुते व नारायण बनकर यांनी केली आहे.

